# <u>म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र.२६/२०२१ आदेश नि.क्र.३३</u>

निर्मला प्रल्हाद डाखोरे **वि.** प्रल्हाद तुकाराम डाखोरे

प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी गैरअर्जदाराचे खावटीच्या वसुलीकरीता पगारपत्रक मागविणेबाबत दाखल केला आहे. अर्जदार यांचे अर्जातील कथन असे आहे की, गैरअर्जदार ज्या रुग्णालयामध्ये सेवेत आहे त्या अधिका-यांकडे म्हणजेच मा. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रूग्णालय, वाशिम यांचे कार्यालयात गैरअर्जदाराचे पगारपत्रक उपलब्ध करून देणेबाबत अर्ज केलेला असुन आजपर्यंत कार्यालयाने गैरअर्जदाराचे पगारपत्रक उपलब्ध करुन दिले नाही. त्यामुळे अर्जदारास खावटी अभावी उपासमारीची वेळ आलेली आहे. तरी गैरअर्जदाराचे पगारपत्रक संबंधीत कार्यालयाकडुन बोलावुन घेवुन त्यामधुन खावटी रक्कम कपात करणेबाबतचा आदेश पारीत करण्याची विनंती केली.

०२. गैरअर्जदार यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज त्यांच्याविरुध्द विना म्हणणे चालविण्यात आला.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांना दरमहा रू.३०००/- (अक्षरी तीन हजार रूपये केवळ) अंतरिम पोटगी मंजुर करण्यात आलेली असुन आजतागायत गैरअर्जदाराने पोटगीची रक्कम भरलेली नाही. अर्जदार यांनी निशाण ३२ वर गैरअर्जदार यांचे पागरपत्रकाची मा.जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रूग्णालय, वाशिम यांना मागणी केलेली आहे. परंतु तसे पगारपत्रक दिले नसल्याचे दिसते म्हणुन त्यांनी हा अर्ज केल्याचे दिसते. प्रस्तुत प्रकरणी अंतरिम पोटगी मंजुर होवुन देखील ती मिळालेली नाही. त्यामुळे न्यायाचे कारणास्तव व पोटगी वसुल होणेकामी सदरचा अर्ज मंजुर होणे गरजेचे आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करतो :-

## <u>आदेश</u>

०१. मा. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रूग्णालय, वाशिम यांनी गैरअर्जदार नामे प्रल्हाद तुकाराम डाखोरे यांचे माहे सप्टेंबर-२०२५ चे पगारपत्रक न्यायालयात सादर करावे.

२. येणेप्रमाणे पत्र व्यवहार करण्यात यावा.

AMIT SUNIL KOSHTI

Digitally signed by AMIT SUNIL KOSHTI
Date: 2025.10.08 15:51:30 +0530

ठिकाण : मालेगांव
दिनांक : ०४.१०.२०२५

[अ.सु.कोष्टी]
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी न्यायालय क्र.२
मालेगांव जि. वाशिम.

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that, contents of this PDF file is same word to word, as per original Order **:-**

| | | |
|---|---|---|
| 1. Name of the Stenographer | **:-** | **Shivam B.Patange (LG)** |
| 2. Court Name | :- | Jt. CJJD & JMFC, Malegaon |
| 3. Order dated | :- | 04.10.2025. |
| 3. Order Signed by the P.O. | :- | 08.10.2025. |
| 4. Order uploaded on | :- | 08.10.2025. |